॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

### बातमी क्र.१

जळगाव दि. २४ ( ) कै.वि.वा.शिरवाडकर ऊर्फ कवी कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरवदिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त मंगळवार, दि.२७ फेब्रुवारी रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने कै.भैय्यासाहेब गंधे सभागृहात `वाणी अमृताची ` या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

गतवर्षापासून महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरवदिन मोठया प्रमाणात साजरा केला जात असून विद्यापीठाच्या वतीने शहरात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या वर्षी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने मंगळवारी २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता ला.ना.हायस्कूलच्या गंधे सभागृहात `वाणी अमृताची` हा सांस्कृतिक कार्यक्रम होणोर आहे. या कार्यक्रमाची संकल्पना, लेखन आणि दिग्दर्शन हे लक्ष्मीकांत धोंड यांचे असून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिध्द अभिनेता सिध्दार्थ चांदेकर आणि अभिनेत्री अश्विनी कासार करणार आहेत. सारेगम फेम मुग्धा वैशंपायन तसेच पं.विश्वनाथ दाशरथे, हेमंत पेंडसे, श्रध्दा जोशी, जान्हवी पवार, श्रेया मोहन, शंतनू रोडे, मैथिली पांडे, अभिषेक देशपांडे, अधिश पायगुडे, श्रीकांत उमरीकर, मैथिली हळदेकर, निलेश चव्हाण हे कलावंत सहभागी होणार असून आद्य मराठी कविता, नाटयपद, नृत्य, कथा आणि लेखांचे नाटयरुप, स्वगत, समुहगीत आणि अहिराणी बोलीभाषा गीत यांचे सादरीकरण केले जाणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते होणार असून प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ.केशव तूपे यांची उपस्थिती राहणार आहे. हा कार्यक्रम सर्व नागरिकांसाठी खुला असून उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव भ.भा.पाटील आणि वित्त व लेखाधिकारी डॉ.बी.डी.कऱ्हाड यांनी केले आहे.

---

### बातमी क्र.२

जळगाव दि.२४ ( ) गुजरात राज्यातील गणपत विद्यापीठात नुकत्याच झालेल्या पश्चिम विभागीय संशोधन स्पर्धेत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भौतिकीयेशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थी शुभम पाटील याने विज्ञान गटात तिसरे पारितोषिक प्राप्त केले.

गेल्या आठवडयात ही स्पर्धा झाली. पश्चिम विभागीय संशोधन स्पर्धेत तृतीय पारितोषिक प्राप्त झाल्यामुळे शुभम पाटील याची १४ व १५ मार्च, २०१८ रोजी हरियाणातील चितकारा विद्यापीठ, अंबाला येथे होणाऱ्या राष्ट्रीय संशोधन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. गुजरातमध्ये झालेल्या पश्चिम विभागीय संशोधन स्पर्धेसाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील देवेंद्र पाटील आणि शुभम पाटील हे दोन विद्यार्थी सहभागी झाले होते पैकी शुभम पाटील यास तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. या संघासोबत व्यवस्थापक म्हणून डॉ.दीपक दलाल सहभागी झाले होते. पारितोषिक प्राप्त झाल्याबद्दल शुभम पाटील याचे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी अभिनंदन केले.

..२..

**North Maharashtra University, Jalgaon**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**



**बातमी क्र. ३**

जळगाव (दि.२४)- खान्देशातील आदिवासींचे समाजजीवन, शिक्षणपध्दती, संस्कृती, चालीरिती आणि लोककला माध्यमांचा अभ्यास करण्यासाठी विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा यावल तालुक्यातील उसमळी या आदिवासी पाड्यावर आयोजित करण्यात आला होता.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातील एम.ए.एम.सी.जे. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा दि.२३ फेब्रुवारी २०१८ रोजी यावल व रावेर तालुक्यातील आदिवासी पाड्यावर आयोजित करण्यात आला होता. या दरम्यान विद्यार्थ्यांनी रावेर तालुक्यातील लोहारा व पाल तर यावल तालुक्यातील गाडऱ्या, गारखेडा, निमळया, जामन्या व उसमळी या गाव पाड्यांना भेटी देवून तेथील माहिती जाणून घेतली.

अभ्यासदौऱ्यात विद्यार्थ्यांनी लोहारा, पाल व जामन्या येथील सातपुडा विकास मंडळ संचलित अनुदानीत प्राथमिक, माध्यमिक आश्रम शाळांना भेटी देवून आदिवासींच्या शिक्षणप्रणाली विषयी माहिती जाणून घेतली. यावेळी संस्थेचे सचिव अजित पाटील, प्राथमिकचे मुख्याध्यापक गोविंद अत्तरदे (पाल), सुधाकर झोपे (लोहारा), लिपीक संजय इंगळे व प्रदिप नेहते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून सहकार्य केले.

उसमळी हा आदिवासी पाडा सातपुड्याच्या पाचव्या रांगेत आहे. अतिशय दुर्गम भागात हा पाडा असून तो वनविभागाच्या जंगल संरक्षीत क्षेत्रात आहे. त्यामुळे या ठिकाणी खऱ्या अर्थाने आदिवासी समाजजीवनाचा अभ्यास विद्यार्थ्यांना करता आला. या भागातील आदिवासींशी चर्चा करून त्यांच्या चालीरिती, संस्कृती, खानपान पध्दती, रोजगाराची साधने आणि विविध लोककला याविषयी माहिती जाणून घेतली. सोबतच आदिवासींसोबत नृत्य करून पारंपारिक ढोल वाजविण्याचा आनंद देखील घेतला.

या अभ्यासदौऱ्याचे आयोजन विभागातील डॉ.सुधीर भटकर व डॉ.विनोद निताळे यांनी केले. यासाठी त्यांना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यावलचे सहायक लेखाअधिकारी अविनाश शिवरामे यांचे सहकार्य लाभले.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. २४ फेब्रुवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी